आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.००वाजता

२० ऑगस्ट २०२४ - मंगळवार

**ठळक बातम्या**

- ठाणे जिल्ह्यात बदलापूर इथं २ शाळकरी मुलींवर लैंगिक अत्याचार झाल्याप्रकरणी संतप्त नागरिकांचं आंदोलन

- या प्रकरणी चौकशीसाठी विशेष तपास पथकाची स्थापना करण्याचे राज्यशासनाचे निर्देश / शाळांमधेही विशाखा समित्या बंधनकारक होणार

- देशातल्या डॉक्टर आणि आरोग्य कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेसाठी सर्वोच्च न्यायालयाने केली नॅशनल टास्क फोर्सची स्थापना / कोलकाता प्रकरणातला चौकशी अहवाल येत्या गुरुवारी सादर करण्याचे सीबीआय ला दिले निर्देश

- समांतर भरतीसाठीची जाहिरात रद्द करण्याची केंद्रसरकारची संघ लोकसेवा आयोगाला सूचना

**आणि**

- माजी प्रधानमंत्री दिवंगत राजीव गांधी यांच्या जयंतीनिमित्त आज सर्वत्र सद्भावना दिवसाचे कार्यक्रम

<><><><><>

ठाणे जिल्ह्यातल्या बदलापूर इथल्या एका शाळेत दोन विद्यार्थिनींवर झालेल्या लैंगिक अत्याचार प्रकरणी संतप्त झालेल्या पालक आणि नागरिकांनी बदलापूर रेल्वेस्थानकात रेल्वे रोको आंदोलन सुरू केलं आहे. यामुळे रेल्वेसेवा विस्कळीत झाली आहे. परिस्थिती हाताळण्यासाठी

या परिसरात पोलीस बंदोबस्त करण्यात आला आहे आणि पोलीसांनी आंदोलकांना रेल्वेमार्ग मोकळे करण्याची विनंती करत आहेत. दरम्यान विविध रेल्वेगाड्या आधीच्या स्थानकांवर थांबवण्यात आल्या आहेत. महाराष्ट्र राज्य महिला आयोगानं या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन पोलिसांनी आत्तापर्यंत केलेल्या तपासाचा अहवाल मागवला आहे. संबंधित शाळेनं माफीनामा जारी केला असून शाळेच्या मुख्याध्यापिकेला निलंबित करण्यात आलं आहे. तसंच मुलांची जबाबदारी असलेल्या दोन सेविकांनाही कामावरून कमी करण्यात आलं आहे.

याप्रकरणी संशयित आरोपीला अटक करण्यात आली असून त्याच्यावर पॉक्सोसह संबंधित कलमांतर्गत गुन्हे दाखल करण्यात आल्याची माहिती मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली आहे. हा खटला फास्ट ट्रॅक न्यायालयात चालवण्याचं, तसंच यासाठी एक विशेष सरकारी वकील नेमण्याचं आश्वासनही त्यांनी दिलं. या प्रकरणी आरोपीला कडक शासन करण्यात येईल, असं सांगत, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रसंगी संस्थाचालकांवर देखील कारवाई करण्यात येईल असं स्पष्ट केलं सर्व शाळांमध्ये सखी सावित्री समित्या स्थापन झाल्या आहेत किंवा नाही ते तपासण्याचे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी दिले. या घटनेची चौकशी करण्यासाठी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पोलिस महानिरीक्षक दर्जाच्या वरिष्ठ **IPS** अधिकारी आरती सिंग यांच्या अध्यक्षतेखाली विशेष तपास पथक स्थापन करण्याचे आदेश दिले आहेत.

मुलींच्या सुरक्षेसाठी राज्यात सर्व शाळांमध्ये विशाखा समित्या स्थापन करणं बंधनकारक करण्याचे आदेश आजच जारी करण्यात येणार असल्याचं शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनी सांगितलं. बदलापूर येथील अत्याचाराची घटना उघडकीस आल्यानंतर मंत्रालयात शिक्षण विभागाची तातडीची बैठक घेण्यात आली. या बैठकीनंतर माध्यमांशी बोलताना केसरकर यांनी ही माहिती दिली. याबाबतची तक्रार दिल्यानंतरही जवळपास बारा तास कारवाई झाली नाही. त्यामुळे संबंधित पोलिस निरीक्षकाची बदली करण्यात आली आहे, असं त्यांनी सांगितलं. दरम्यान या घटनेबद्दल निषेधाच्या प्रतिक्रिया उमटत आहेत. गुन्हेगारांना कठोर शिक्षा व्हावी अशी मागणी विधानसभेतले विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी केली आहे. आपल्या सरकारने शक्ती कायदा आणण्यासाठी मसुदा तयार केला आहे. या सरकारने ते बिल मंजूर करून शक्ती कायद्याची शक्ती दाखवून द्यावी, असं आवाहन माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी केले. राज्यात मुलींच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर झाला असल्याचं म्हणत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते जयंत पाटील यांनी राज्यशासनाच्या धोरणांवर टीका केली आहे.

<><><><><>

देशातल्या डॉक्टर आणि आरोग्य कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेसंबंधी उपाययोजना सुचवण्यासाठी सर्वोच्च न्यायालयानं राष्ट्रीय कृती दलाची स्थापना केली आहे. या कृती दलाला तीन आठवड्यात हंगामी अहवाल आणि दोन महिन्यात अंतिम अहवाल सादर करण्याचे निर्देश सरन्यायाधीश धनंजय

चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखालच्या पीठाने आज दिले. या कृती दलात देशभरातल्या निवडक डॉक्टरांचा समावेश असून आरोग्य कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेसाठी काय करता येईल याबद्दल ते सल्ला देतील. कोलकाता डॉक्टर बलात्कार आणि हत्या प्रकरणाची सुनावणी करताना सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांनी आरोग्य कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेविषयी चिंता व्यक्त केली.

या प्रकरणात सीबीआयनं केलेल्या तपासाचा अहवाल २२ ऑगस्ट पर्यंत सादर करण्याचे आदेशही न्यायालयाने दिले आहेत. तपासात राहिलेल्या त्रुटीबद्दल न्यायालयाने नाराजी व्यक्त केली. हत्येला आत्महत्या ठरवण्याचा प्रयत्न केला गेला, एफआयआरमध्ये हत्येचा उल्लेख केला गेला नाही, याबद्दल न्यायालयाने वैद्यकीय महाविद्यालय प्रशासन आणि पोलिसांना जाब विचारला. तसंच पीडितेची ओळख सार्वजनिक करणं हे धक्कादायक असल्याचंही न्यायालयानं म्हटलं आहे. जमावानं घटनास्थळावर जाऊन तोडफोड केली, तसंच पुराव्यांशी छेडछाड करण्याचा प्रयत्न केला, यावर पोलिसांनी काहीच कारवाई का केली नाही, असा जाब न्यायालयाने विचारला.

आरोग्य कर्मचाऱ्यांची कामाची जागा सुरक्षित असणं महत्त्वाचं असल्याचं न्यायालयानं म्हटलं. देशभरातल्या आरोग्य कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेत कोणतीही कमतरता राहणार नाही, याबद्दल आश्वस्त करत न्यायालयाने आरोग्य कर्मचाऱ्यांना कामावर परतण्याचं आवाहन केलं आहे.

दरम्यान, सर्व केंद्र सरकारी रुग्णालयांमध्ये सुरक्षा व्यवस्था २५ टक्के वाढवायला केंद्र सरकारनं मान्यता दिली आहे.

<><><><><>

केंद्रीय लोकसेवा आयोगाने जाहीर केलेली विविध पदांवरची समांतर भरतीची जाहिरात रद्द करावी अशी विनंती केंद्रीय मंत्री डॉ. जितेंद्र सिंह यांनी लोकसेवा आयोगाच्या अध्यक्ष प्रीती सुदन यांना केली आहे. २०१४पूर्वी अनेक पदांवर अशाच प्रकारे भरती करण्यात आली होती. मात्र, त्यानंतर पक्षपात झाल्याचे आरोप झाले होते. पद भरतीची प्रक्रिया पारदर्शक पद्धतीने आणि राज्यघटनेने नमूद केलेल्या समानता आणि सामाजिक न्यायाच्या तत्वांशी सुसंगत असणं आवश्यक आहे. उपेक्षित समाजातल्या पात्र उमेदवारांना सरकारी सेवांमध्ये त्यांचे योग्य प्रतिनिधित्व मिळावं यासाठी आरक्षणाची तरतूद आहे. मात्र समांतर पदभरतीत आरक्षणाची तरतूद नाही. त्यामुळे लोकसेवा आयोगानं १७ ऑगस्ट रोजी प्रसिद्ध केलेली जाहिरात रद्द करावी अशी विनंती सिंह यांनी पत्राद्वारे केली आहे.

<><><><><>

देशाचे माजी प्रधानमंत्री दिवंगत राजीव गांधी यांची आज ८० वी जयंती असून हा दिवस सद्भावना   दिवस म्हणून पाळला जातो.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी ही समाजमाध्यमावरून राजीव गांधी यांना आदरांजली वाहिली. काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी नवी दिल्लीत वीर भूमी या राजीव गांधी यांच्या समाधीस्थळी जाऊन पुष्पांजली अर्पण केली.

मुंबईत राजभवनात राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांनीही राजीव गांधी यांना आदरांजली वाहिली. राजभवनातील अधिकारी, कर्मचारी, मुंबई पोलिस दलाचे अधिकारी आणि जवानांना तसंच सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कर्मचाऱ्यांना सद्भभावनेची प्रतिज्ञा दिली. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीही आज, मंत्रालयात राजीव गांधी यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण

करून अभिवादन केलं. राजीव गांधी यांच्या जयंतीनिमित्त आयोजित सद्भवना दिनाच्या कार्यक्रमात उपस्थित असलेल्यांना उपमुख्यमंत्र्यांनी समाजात एकता, शांतता, बंधुता, सामाजिक सद्भावना कायम ठेवण्यासाठी प्रयत्न करण्याची शपथ दिली.

<><><><><>

नैसर्गिक आपत्तींमुळे होणारी जीवितहानी रोखण्यासाठी अशा आपत्तींची पूर्वसूचना देणारी यंत्रणा सक्षम आणि अचूक करण्याची गरज असल्याचं मत राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज मांडलं. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज प्रतिष्ठेचे राष्ट्रीय भू विज्ञान पुरस्कार २०२३ प्रदान केले. केंद्रीय कोळसा आणि खाण काम मंत्री जी किशन रेड्डी आणि केंद्रीय राज्यमंत्री सतीशचंद्र दुबे या कार्यक्रमाला उपस्थित होते. राष्ट्रीय भूविज्ञान जीवन गौरव, राष्ट्रीय युवा भूवैज्ञानिक आणि भूविज्ञानाच्या विविध क्षेत्रांसाठीचा राष्ट्रीय भूविज्ञान पुरस्कार अशा तीन श्रेणींमध्ये हे पुरस्कार देण्यात आले, तसंच भूविज्ञान क्षेत्रात सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या व्यक्ती आणि संस्थांचा यावेळी गौरव करण्यात आला.

उपयोजित भूगर्भशास्त्र श्रेणीतला वैयक्तिक पुरस्कार आयआयटी मुंबईतले डॉ विक्रम विशाल यांना मिळाला आहे.

<><><><><>

गेल्या वर्षी फेब्रुवारी आणि एप्रिल महिन्यात झालेल्या अवकाळी पाऊस, गारपीट आणि वादळी वाऱ्यांमुळे झालेल्या पिकांच्या नुकसानासाठी अकोला जिल्ह्यातल्या २७ हजार ६८० शेतकऱ्यांसाठी शासनामार्फत ५४ कोटी ५५ लाख रुपयांची मदत मंजूर झाली आहे. या मदतीच्या अनुषंगाने जिल्ह्यातल्या

नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या नावांची यादी ई पंचनामा पोर्टलवर अपलोड करण्याचं काम १४ ऑगस्टपासून महसूल प्रशासनानं सुरू केलं आहे. या याद्यांचं काम पूर्ण झाल्यानंतर शेतकऱ्यांच्या खात्यात मदतीची रक्कम जमा होणार आहे.

//<><><><><>//